## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३१/२०२४ मधील निशाणी ०१ वरील आदेश

**(श्रीमती लक्ष्मीकांत चौकेकर वगैरे वि. स्नेहलता पेडणेकर)**

**सीएनआरनं.एमएचएसआय–०५–०००३७४२०२४**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ चे कलम २ व ८ अन्वये त्यांचे नावे मयत दिशा लक्ष्मीकांत चौकेकर **(यापुढे "मयत दिशा" असा उल्लेख)** यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतकामी मयत दिशा ही अर्जदार क्र. १ यांची पत्नी व अर्जदार क्र. २ (अर्जदार क्र.२ करीता अ.पा.क. अर्जदार क्र.१) यांची आई आहे. दिशा ही दि.१०/०२/२०२४ रोजी मौजे–उभादांडा, ता. वेंगुर्ला येथे मयत झाली आहे. मयत दिशा यांना अर्जदार क्र. १, २ व सामनेवाला हे सरळ व कायदेशीर वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त मयत दिशा यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत दिशा यांचे मृत्युपश्चात अर्जदार क्र.२ यास अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याचे अनुषंगाने हक्क प्रलंबित ठेवावा अशी विनंती केली असता गटविकास अधिकारी, गट–अ, पंचायत समिती वेंगुर्ला यांनी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र सादर करण्यास सांगितले. त्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार क्र. १ व २ व सामनेवाला यांच्या व्यतिरिक्त मयत दिशा यांचे दुसरे कोणी वारस आहे किंवा नाही हे जाणून घेण्याकरीता प्रस्तुतकामी अर्जदार यांच्यावतीने दि.०८/०५/२०२५ रोजी "दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्र" या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ यांनी नि.क्र.०९ व नि.क्र.२१ प्रमाणे अहवाल दाखल केला असून सदर अहवालानुसार वेंगुर्ला तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर, ग्रामपंचायात उभादांडा यांच्या नोटीस बोर्डावर, दिवाणी न्यायालय क. स्तर, वेंगुर्ला यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व मयताच्या घरावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते.

४. अर्जदार क्र.१, २ आणि सामनेवाला यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्याचा अर्ज व सोबत दाखल कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १,२ व सामनेवाला हे मयत दिशा यांचे वारस म्हणून त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत का ? | अंशतः होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

५. सदर अर्जाच्या पृष्ट्यर्थ अर्जदार यांनी अर्जदार क्र. १ श्री. लक्ष्मीकांत जर्नादन चौकेकर यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी १३ येथे दाखल केले आहे. अर्जदार यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून मयत दिशा यांचा मृत्यूदाखला (नि.१४), सुभाष शशिकांत वाईरकर यांचे मृत्युप्रमाणपत्र (नि.१५), अर्जदार क्र.१ व दिशा उर्फ स्नेहल सुभाष वाईरकर यांचे विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र (नि.१८), अर्जदार क्र.२ कु.चंद्रकांत लक्ष्मीकांत चौकेकर याचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र (नि.१९), दि.०८/०५/२०२५ रोजी "दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्र" या वर्तमापत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द केले होते ते वर्तमानपत्र (नि.१२) इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ अहवाल नि.क्र.०९ व नि.क्र.२१ येथे दाखल आहे. तसेच मयत दिशा यांना तिच्या प्रथम विवाहापासून कोणतेही अपत्य नाही अशी पुरशीस (नि.२२) दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी प्रस्तुतकामी ज्यादा पुरावा देण्याचा नाही अशी नि. क्र. २० वर पुरशीस दाखल करुन या कामी पुरावा बंद केला आहे.

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ करीता :-**

६. अर्जदार यांनी अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ व त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र

मिळण्याकरीता अर्जदार क्र.१ श्री. लक्ष्मीकांत जर्नादन चौकेकर यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१३ वर दाखल केले आहे. सदर शपथपत्रातील कथनानुसार, दिशा ही दिनांक १०/०२/२०२४ रोजी मौजे–उभादांडा, ता. वेंगुर्ला येथे मयत झाली आहे. मयत दिशा यांच्या पश्चात त्यांना अर्जदार क्र. १, २ व सामनेवाला हेच सरळ व कायदेशीर वारस हयात आहे व त्याच्या व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाही.

७. सदर प्रकरणात "दैनिक नवराष्ट्र वृत्तपत्र" या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस तसेच जाहीर प्रगटन बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या, परंतु सदर नोटीस व जाहीरनामा प्रसिध्द झाल्यानंतर मुदतीत अर्जदार क्र. १, २ व सामनेवाला यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणीही हरकत नोंदविली नाही. तसेच प्रस्तुतकामी अर्जदार क्र. १, २ व सामनेवाला यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही मयत दिशा यांचे वारस असल्याबाबत अथवा अर्जदार क्र. १, २ व सामनेवाला हे मयत दिशा यांचे वारस नसल्याबाबतचा आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार क्र. १ लक्ष्मीकांत यांचा शपथेवरील जबाब व प्रकरणातील कागदपत्रे ही प्रस्तुत प्रकरणात कोणीही आक्षेप घेतला नसल्यामुळे शाबीत झालेली आहेत. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिशा यांचा दिनांक १०/०२/२०२४ रोजी मृत्यू झालेला आहे. हिंदु वारसा कायदा कलम १५ प्रमाणे मयत स्त्रीच्या पश्चात तिची मुले व पती हे प्रथम वारस असतात. प्रस्तुतकामी दिशा यांच्या मृत्युपश्चात तिचे पती लक्ष्मीकांत व मुलगा चंद्रकांत हे प्रथम वारस आहेत. त्यामुळे वारस दाखला हा केवळ त्यांच्या नावे देणे न्यायसंगत आहे. अर्जदार क्र. १ लक्ष्मीकांत यांच्या अर्जातील कथने व दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार क्र. १ व २ हे मयत दिशा यांचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ अंतर्गत दाखल प्रकरणामध्ये देण्यात येणारे वारसा प्रमाणपत्र हे वारस या स्थितीची औपचारीक ओळख (Formal Recognition) म्हणून देण्यात येते. प्रस्तुतकामी अर्जदार क्र.१ लक्ष्मीकांत यांनी वारस प्रमाणपत्र हे केवळ अर्जदार क्र.२ चंद्रकांत यांच्या नावे देण्यात यावे व त्यास सामनेवाला तसेच अर्जदार क्र. १ यांची कोणतीही हरकत नाही असे स्पष्टपणे कथन केले आहे. प्रस्तुतकामी वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज

मंजूर होण्यास पात्र आहे व वरील सर्व कारणास्तव अर्जदार क्र. २ (अर्जदार क्र.२ करीता अ.पा.क. अर्जदार क्र.१) यांना वरील कायद्यांतर्गत वारस प्रमाणपत्र देणे न्यायाच्या दृष्टीने उचित आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.२ (अर्जदार क्र.२ करीता अ.पा.क. अर्जदार क्र.१) चंद्रकांत लक्ष्मीकांत चौकेकर हे मयत दिशा लक्ष्मीकांत चौकेकर यांचे वारस ही औपचारीक ओळख म्हणून सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र.२ (अर्जदार क्र.२ करीता अ.पा.क. अर्जदार क्र.१) यांच्या नावे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावे.

३. वारस प्रमाणपत्रावर दिवाणी नियम पुस्तिका परिच्छेद ३१२ मधील नमूद निर्देशांची नोंद घेण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.04.15 18:06:47 +0530

स्थळ – वेंगुर्ला
दिनांक –१५/०४/२०२६

**(एस.जे. चिवटे)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
वेंगुर्ला.